# खारघरमध्ये राज्यस्तरीय वेटलिफ्टींग स्पर्धेचे यशस्वी आयोजन

पनवेल(प्रतिनिधी) ताकद आणि हिम्मत या गोष्टींची गरज असणारा भारत्तोलन हा जिगरबाज खेळ काळाच्या पडद्याआड जात आहे की काय ? अशी चिंता व्यक्त करित तरूणांना प्रोत्साहन देवून या खेळाकडे आकर्षित करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करू अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन खारघरमधील घरकुल सेक्टर १५ रहिवाशी संघ सार्वजनिक मंडळाच्या कला मंचावर खारघर शहर कॉग्रेस कमिटी व महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टींग असोसिएशन यांच्यावतीने रविवार (दि.१५) निमंत्रित राज्य पॉवरलिफ्टींग स्पर्धा २०१४ चे आयोजन करण्यात आले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या स्पर्धे दरम्यान भेट दिली यावेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. ते पुढे म्हणाले की, भारत्तोलन म्हणजे वेट लिफ्टींग या खेळाकडे शासनाचे लक्ष वेधणे गरजेचे आहे. या खेळामुळे आरोग्याचे संवर्धन व संगोपन केले जाते, तरूण पिढी निरोगी राहते. यामुळे खेळाडूंना नोकऱ्या नियुक्ती व पुरस्कार देवून त्यांचे गौरव कौतुक केले पाहिजे तसेच अशा स्पर्धाचे ही आयोजन अधिक प्रमाणात होणे गरजेचे आहे. असे सांगून खेळाडूंचे किर्तीमान वाढावे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास पनवेल शहर कॉग्रेसचे कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, खारघर शहर कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर, महिला अध्यक्षा कुंदा मेंगडे, ॲड.जे.पी.खारगे, साधना पवार, स्मिता सावर्डेकर, कृष्णा खडगे, गणेश खेर, महाराष्ट्र पॉवर लिफ्टींग असोसिएशन अध्यक्ष मधुकर दरेकर सरचिटणीस संजय सरदेसाई, चिटणीस संजय माधव, पंच दिलीप डोळसकर, विभिषण पाटील, आनंद चाळके, सुर्यकांत गरूडे, सतिष पाताडे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धा पुरूष व महिलांच्या अनुक्रमे नऊ व आठ गटांमध्ये घेण्यात येणार असून संपूर्ण महाराष्ट्रातून १२० खेळांडूनी या स्पर्धेत सहभाग घेतला.